शनिवार, दि. २३ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# पोलिस अधिकाऱ्याच्या कृतीचा व्हिडिओ; बदनामीचा कट की सहज प्रसिद्धी?

**दीपक शेळके**

**जालना -** येथील पोलिस उपअधीक्षक अनंत कुलकर्णी यांच्या व्हिडिओ क्लिपच्या प्रकरणाने एक गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे: हा व्हिडिओ केवळ एका क्षणाची निवडक क्लिप दाखवून पोलिस प्रशासनाची प्रतिमा मलिन करण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न होता का? या व्हिडिओची निर्मिती, प्रसार आणि त्यामागील संभाव्य हेतू याबाबत सखोल तपास आणि विश्लेषण करणे आवश्यक आहे.

आजच्या डिजिटल युगात, कोणत्याही घटनेतील केवळ एक लहान भाग (व्हिडिओ क्लिप) काढून तो व्हायरल करणे खूप सोपे झाले आहे. याला 'सिलेक्टिव्ह व्हिज्युअल' म्हणतात. जालना घटनेच्या व्हिडिओमध्ये फक्त 'लाथ' मारण्याचा क्षण दाखवला गेला, ज्यामुळे सामान्य जनतेला पोलिसांची क्रूर बाजूच दिसली. या व्हिडिओमध्ये घटनेची पार्श्वभूमी, आंदोलकाचा आत्म दहनाचा प्रयत्न आणि त्याने महिला पोलिसाला केलेला धोका यासारखे महत्त्वाचे तपशील जाणीवपूर्वक वगळले गेले असावेत. अशा निवडक व्हिडिओ क्लिपचा वापर अनेकदा एखाद्या व्यक्तीची किंवा संस्थेची प्रतिमा खराब करण्यासाठी केला जातो.

या व्हिडिओची सत्यता आणि त्यामागील उद्देश जाणून घेण्यासाठी काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे:

व्हिडिओ कोणी काढला? व्हिडिओ काढणारी व्यक्ती पोलीस द्वेषी की आंदोलकांच्या बाजूची होती की अन्य?

तो कुणाच्या मदतीने तयार केला गेला? व्हिडिओची कटिंग आणि एडिटिंग करून फक्त निवडक भाग का व्हायरल केला गेला? यामागे कुणाचे मार्गदर्शन होते का?

जर व्हिडीओ एखाद्या पत्रकाराने घेतला असेल तर तो स्वतःच्या वृत्तपत्रात, टिव्ही चॅनेल, अथवा स्वतःच्या युट्युबला घेणे अपेक्षित असते.

प्रसिद्धीसाठी कुणाकुणाला पाठवला? व्हिडिओ केवळ स्वतः न वापरता, तो जाणीवपूर्वक ईतर मर्जीतील सहकाऱ्यांना, सोशल मीडिया ग्रुप्स, व्हॉट्सप आणि इतर माध्यमांवर का प्रसारणासाठी पाठविला गेला?

हेतू काय होता? ज्या व्यक्तीने व्हिडिओ घेतला, त्याने स्वतः प्रसिद्ध न करता तो इतरांना देण्यामागे विशिष्ट राजकीय, सामाजिक किंवा वैयक्तिक हेतू होता का?

या प्रश्नांची उत्तरे मिळाल्यावरच या व्हिडिओमागचा खरा उद्देश उघड होऊ शकतो.

आजच्या काळात सोशल मीडिया हे एक शक्तिशाली माध्यम बनले आहे. मात्र, त्याचा गैरवापर करून कोणाचीही बदनामी करणे शक्य झाले आहे. व्हिडिओ, फोटो किंवा चुकीची माहिती प्रसारित करून कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला सहज बदनाम करता येते. जालना प्रकरणातील व्हिडिओ हे त्याचेच एक उदाहरण असू शकते, जिथे एका क्षणाची कृती संपूर्ण पोलिस दलाच्या कार्यक्षमतेवर आणि हेतूवर प्रश्नचिन्ह निर्माण करते.

अशा घटनांमध्ये, व्हिडिओच्या **पान ३ वर**

## 'काही बोटावर मोजण्याइतके' आणि संपूर्ण दल

हे मान्य आहे की कोणत्याही मोठ्या संस्थेत काही चुकीचे लोक असू शकतात. काही पोलीस कर्मचारी भ्रष्ट असू शकतात, तर काही चुकीचे वर्तन करू शकतात. मात्र, या काही मोजक्या लोकांच्या चुकांमुळे संपूर्ण पोलिस दलाला वाईट म्हणणे हा मोठा अन्याय आहे. काही चुका अनावधानाने देखील होतात, याच पोलिस दलात असे अनेक प्रामाणिक आणि निस्वार्थी अधिकारी आहेत, जे जीवावर उदार होऊन जनतेची सेवा करतात. गुन्हेगारांचा पाठलाग करताना, दंगली नियंत्रणात आणताना किंवा नैसर्गिक आपत्तीमध्ये अडकलेल्या लोकांना मदत करताना ते आपल्या प्राणाची पर्वा करत नाहीत. आपण प्रत्येकाने पोलिसांच्या या कष्टाला, त्यांच्या योगदानाला आणि त्यागाला समजून घ्यायला हवे. त्यांच्याबद्दल सहानुभूती ठेवून त्यांना मानसिक पाठिंबा देणे महत्त्वाचे आहे. कारण, जेव्हा आपण शांततेत असतो, तेव्हा ते आपल्यासाठी दिवस-रात्र जागे असतात.

## पोलिस उपअधीक्षक कुलकर्णींची कारवाई, कर्तव्य, धैर्य आणि कायद्याचे पालन

जालन्यातील एका आंदोलनादरम्यान पोलीस उपअधीक्षक अनंत कुलकर्णी यांनी केलेल्या कारवाईचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्यावर विविध प्रतिक्रिया उमटल्या आहेत. मात्र, या घटनेचे सखोल विश्लेषण केल्यास, त्यांची कृती केवळ कर्तव्यनिष्ठाच नव्हे, तर असामान्य प्रसंगात दाखवलेले धैर्य आणि निर्णयक्षमता दर्शवते. कायद्याची अंमलबजावणी करताना नागरिकांच्या जीविताची सुरक्षा करणे हे पोलिसांचे प्राथमिक कर्तव्य असते, आणि कुलकर्णी यांनी नेमके तेच केले.

स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्म दहनाचा प्रयत्न होणे हे एक गंभीर आव्हान होते. आंदोलक गोपाल चौधरी गेल्या वर्षभरापासून कौटुंबिक वादातून उपोषण करत होते, त्यामुळे त्यांची मानसिक स्थिती अस्थिर असण्याची शक्यता होती. अशा व्यक्तीकडून कोणत्याही क्षणी अनुचित प्रकार घडण्याची शक्यता असते. या परिस्थितीत, गोपाल चौधरी यांनी एका महिला पोलीस अधिकाऱ्यावर ज्वलनशील पदार्थ फेकण्याचा प्रयत्न केला. हा केवळ आत्मदहनाचा प्रयत्न नव्हता, तर एका कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्याच्या जीविताला धोका निर्माण करणारी कृती होती.

पोलिस उपअधीक्षक कुलकर्णी यांनी या धोक्याचे गांभीर्य ओळखले आणि कोणताही विलंब न करता परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तातडीने हस्तक्षेप केला. त्यांच्या समोर दोन मुख्य उद्दिष्टे होती: आत्मदहन करणाऱ्या व्यक्तीला स्वतःला इजा करण्यापासून रोखणे.

परिस्थिती नियंत्रणात आणून अन्य पोलिस कर्मचाऱ्यांची आणि नागरिकांची सुरक्षा सुनिश्चित करणे.

व्हिडिओमध्ये दिसणारी लाथ ही केवळ एक प्रातिनिधिक कृती होती, जी एका आक्रमक व्यक्तीला तात्काळ थांबवण्यासाठी अत्यावश्यक बळाचा वापर म्हणून केली **पान ३ वर**

## पोलिसांचे जीवन: कर्तव्य, त्याग आणि समाजाप्रती समर्पण




युवा आदर्श

## साजरा पोळा ...

**सर्जा राजा बोलले**
**आला पोळा सण**
**विनंती बळीराजा**
**एक ऐकायची पण**
**नको पुरण पोळी**
**शिळीभाकर आण**
**काढू नको बा ऋण**
**आमची तुज आण**
**थकल्या पायी बा**
**नको हिंडू वणवण**
**खाऊ सगळे मिळून**
**खूप होई कणकण**
**दुष्काळ नि महापूर**
**घाव घाले घण घण**
**सात बारा रक्ताळले**
**आश्वासनी तुणतुणं**
**नवे आणले तंत्रज्ञान**
**काम नुरे काही पण**
**निवांत बसे खोपटी**
**पोसतो मज तरीपण**
**घेशी किती अनुदान**
**ओझे वाढे मणमण**
**अंधकार गरिबीचा**
**प्रकाश रे मिणमिण**
**ताईची हो सोयरिक**
**काही पाडू नको उणं**
**लग्न होता आनंदाने**
**तोच असे खरा सण**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# रविवारी फोटोग्राफी व रिल स्पर्धा

## अकरा हजाराचे प्रथम तर पाच हजाराचे द्वितीय बक्षीस

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील गणेशोत्सवाला आगळावेगळा रंग देणाऱ्या वीर सावरकर गणेश मंडळ व पैलवान ग्रुपचा राजा यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सवानिमित्त रविवार दि. २४ ऑगस्ट रोजी निशुल्क फोटोग्राफी आणि रिल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रथम पारितोषिक ११ हजार तर द्वितीय ५ हजाराचे पारितोषिक दिले जाणारअसून ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे.




या मंडळाच्या २७ फूट उंचीच्या श्री चे आगमन मुंबईच्या धर्तीवर ३ दिवस अगोदरच २४ ऑगस्ट रोजी मंडळाच्या मंडपात होणार आहे. २७ ऑगस्टला विधिवत प्रतिष्ठापना होईल. श्री आगमनानिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीची रील व फोटो काढून या स्पर्धेत सहभागी व्हायचे आहे. त्यानंतर बडी सडकवरील नरनारायण मंदिरात २४ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता ही स्पर्धा होईल. रिल किमान ३० सेकंद आणि कमाल १ मिनिटांच्या असाव्यात. २६ ऑगस्टपर्यंत स्पर्धकांना रिल सादर करता येतील. रिल तयार करताना फक्त गर्दी आणि मूर्तीवर फोकस करणे आवश्यक असून, अन्य **पान ३ वर**

## टेंभुर्णीचा ऐतिहासिक पोळा शांततेत साजरा

# ग्रामपंचायततर्फे मानकरी यांचा सत्कार

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** एक ऐतिहासिक गाव, पोळा सण आला की एक ऐतिहासिक अशा पद्धतीने पोळा भरतो. टेंभुर्णी मध्ये तीन ठिकाणी पोळा भरतो. टेंभुर्णी मध्ये, देऊळगाव राजा वेस, जाफराबाद वेस, माळीवेस या ठिकाणी ऐतिहासिक पोळा भरला जातो. या ठिकाणी मानकरी आपापल्या मानाच्या बैलाची पूजा केल्या जाते. व मानाच्या बैलाची पूजा केल्यानंतर, सर्वप्रथम मानाचे बैल तोरणा मधून काढल्या जातात. आनंदाने शेतकरी आपल्या बैलाला वेशी मध्ये घेऊन, बैल पोळा साजरा होतो. येथील देऊळगाव राजा वेस जाफराबाद वेस, त्या ठिकाणी देशमुख मंडळीचा मान असून, माळीवेस येथे माळी समाजाचा मान आहे. टेंभुर्णी चा पोळा हा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने भरवल्या जातो. गावातील सर्व बालगोपाल शेतकरी नागरिक हा पोळा पाण्यासाठी जमलेले असतात. शेतकरी आपल्या बैलांना विविध पद्धतीने सजवतात. दुसऱ्या **पान ३ वर**



## आ. बबनराव लोणीकर यांचा गंभीर आरोप

# भ्रष्ट यंत्रणेचा मास्टरमाइंड निवासी जिल्हाधिकारी

## दोषी ७४ पैकी केवळ २८ जणांवर गुन्हे दाखल; उर्वरित दोषींवरही फौजदारी गुन्हे दाखल होणार!

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील अंबड आणि घनसावंगी तालुक्यात २०२२-२३ आणि २०२३-२४ या कालावधीत अतिवृष्टी, गारपीट आणि नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांसाठी शासनाने दिलेले अनुदान वाटपात मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. या प्रकरणात तब्बल ७९ कोटी ६७ लाख रुपयांचा अपहार झाल्याचे जिल्हाधिकाऱ्यांच्या चौकशी समितीच्या अहवालात नमूद आहे, माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी या घोटाळ्याची व्याप्ती १५० कोटी रुपयांहून अधिक असल्याचा दावा करत निवासी जिल्हाधिकाऱ्यांवर थेट भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले आहेत. या सर्व घोटाळ्याचे मास्टरमाईंड हे निवासी जिल्हाधिकारी पासून या सर्व घोटाळ्याची एसआयटी द्वारे तात्काळ चौकशी करण्याची आवश्यकता या संदर्भात आपण अनेकदा विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी जालना यांच्याशी देखील चर्चा केलेली असल्याचे आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.

या घोटाळ्यात शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा केलेले अनुदान तहसीलदारांच्या ई-मेल आयडीचा गैरवापर, संगणकीय फेरफार आणि बनावट कागदपत्रांच्या साह्याने लाटण्यात आले. चौकशी समितीच्या अहवालानुसार, अंबड तालुक्यातील १३८ गावांमध्ये १४ हजार ३५४ बोगस लाभार्थी, २ हजार ३१९ दुबार अनुदान घेणारे शेतकरी, ३ हजार ९७ क्षेत्र वाढवून अनुदान घेणारे आणि २२ शासकीय जमिनींवर अनुदान घेणारे प्रकरणे आढळली, ज्यामुळे ४४ कोटी ३१ लाख रुपयांचा अपहार झाला. तर घनसावंगी तालुक्यातील ११५ गावांमध्ये ११ हजार ९६१ बोगस लाभार्थी, १० हजार ५४५ दुबार अनुदान घेणारे, ८६१ क्षेत्र वाढवून अनुदान घेणारे आणि २२ शासकीय जमिनींवर अनुदान घेणारे प्रकरणे समोर आली, ज्यामुळे ३५ कोटी ३७ लाख रुपयांचा अपहार झाला. एकूण ७९ कोटी ६७ लाख रुपयांचा हा घोटाळा केवळ शेतकऱ्यांच्या हक्कांवर डाका नसून, संपूर्ण प्रशासनावरचा विश्वास डळमळीत करणारा आहे, असे आमदार लोणीकर यांनी सांगितले.

आमदार बबनराव लोणीकर यांनी या प्रकरणाचा पर्दाफाश करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांनी मुंबईतील पावसाळी अधिवेशनात जालना जिल्ह्यातील अतिवृष्टी अनुदान घोटाळ्याबाबत लक्षवेधी सूचना दिली होती आणि जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत हा मुद्दा आक्रमकपणे मांडला होता. त्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांची संपत्ती जप्त करण्याची मागणी केली होती. १७ ऑगस्ट रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत लोणीकर यांनी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे थेट आरोप करत सांगितले की, ते या घोटाळ्यात प्रत्यक्ष सामील असून, दोषी कर्मचाऱ्यांना वाचवण्यासाठी कागदपत्रे दडवत आहेत. ते म्हणाले, निवासी उपजिल्हाधिकारी हे शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्या भ्रष्ट यंत्रणेचे मूळ केंद्रबिंदू आहेत आणि त्यांनी दोषी तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक आणि तहसीलदार यांना संरक्षण देण्यासाठी जाणीवपूर्वक एफआयआर दाखल करण्यास टाळाटाळ केली आहे.



**निवासी जिल्हाधिकारी यांची अंबड उपविभागीय अधिकारी यांच्या नावे ओरड, एसडीएम च गुन्हे दाखल करत नाहीत अशी चालढकल**

आमदार लोणीकर यांनी निवासी जिल्हाधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करत सांगितले की, त्यांनी घोटाळ्याशी संबंधित अनेक महत्त्वाचे कागदपत्रे दाबून ठेवली आहेत, ज्यामुळे घोटाळ्याची खरी व्याप्ती आणि मोठ्या रकमेचा अपहार **पान ३ वर**

# संपादकीय

## अंतराळ क्षेत्रात महासत्ता

आजचा दिवस संपूर्ण भारतात राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून संपूर्ण साजरा केला जातो. २३ ऑगस्ट हा दिवस भारताच्या अंतराळ इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला कारण याच दिवशी भारताने चंद्रावर तिरंगा फडकावला. या गौरवशाली घटनेची आठवण म्हणून देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. श्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून घोषित केली. या ऐतिहासिक निर्णयामुळे भारतीयांच्या मनात या दिवसाची स्मृती कायमस्वरूपी कोरली गेली या महान दिवसाला आज दोन वर्ष पूर्ण होत आहे. २३ ऑगस्ट २०२३ रोजी संध्याकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी भारताच्या चांद्रयान ३ ने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी लँडिंग केले आणि इतिहास घडला. चंद्रावर यशस्वीपणे यान उतरवणारा भारत हा जगातील चौथा तर दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश बनला. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात भारताने चंद्रावर स्वारी केली यासारखी दुसरी आनंदाची गोष्ट नाही. भारताची ही चांद्र मोहीम चांद्रयान - ३ या नावाने ओळखली जाते. याआधी भारताने दोनदा चंद्रावर पाऊल ठेवण्याचा प्रयत्न केला मात्र दुर्दैवाने तो अपयशी ठरला. २००८ साली चांद्रयान १ या मोहिमेस इस्रोने सुरवात केली त्यानंतर २०१९ साली चांद्रयान २ मोहिमेतील यान चंद्राच्या कक्षेत पोहचूनही सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर विसंगतीमुळे चंद्राच्या पृष्ठभागावर उतरविण्यास अपयशी ठरले होते. अर्थात चांद्रयान २ पूर्णपणे अपयशी ठरले असेही म्हणता येणार नाही कारण चांद्रयान २ मोहिमेवेळी पाठवलेले ऑरबीटर चंद्राच्या कक्षेत यशस्वीपणे कार्यरत होते. या ऑरबीटरवरील काही उपकरणे वापरून चंद्राच्या कक्षेतून पृथ्वीचा अभ्यास केला जात होता. तसेच चंद्र व त्याच्या वातावरणाविषयी नवी वैज्ञानिक माहिती अपल्याला मिळत होती. चांद्रयान ३ हा आधीच्या म्हणजे चांद्रयान २ , मोहिमेचाच भाग होता. या मोहिमेत अपयश आले तेंव्हा यानाचा संपर्क तुटला म्हणून केवल संपर्क तुटा है.... हौसला नहीं! असे म्हणत देशातील १४० कोटी जनता शास्त्रज्ञांच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली. देशातील जनतेला देशातील शास्त्रज्ञांविषयी कमालीचा आदर आणि विश्वास आहे याच विश्वासाच्या बळावर आपल्या शास्त्रज्ञांनी चांद्रयान २ मोहिमेत आलेले अपयश विसरून नव्याने सुरवात केली. चांद्रयान २ मोहिमेच्या अपयशातून धडा घेत चांद्रयान ३ मोहिमेवेळी शास्त्रज्ञांनी पुरेपूर काळजी घेतली होती. यानातील काही घटक ऐनवेळी कार्यन्वित होऊ शकले नाही तरी यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेल अशी नव्या यानात रचना करण्यात केल्याची माहिती इस्रोचे संचालक एम सोमनाथ यांनी दिली होती. सेन्सर निकामी होणे, इंजिनमध्ये बिघाड होणे, संगणकातील नियमसंच व गणितीय प्रक्रिया यात होणाऱ्या चुकांची तपासणी करून त्याचे निराकरण करणे यासारख्या बाबींचा विचार करूनच हे यान चंद्रावर झेपावले होते त्यामुळे यावेळी चंद्रयान ३ यान चंद्रावर यशस्वीपणे उतरेलच असा विश्वास देशातील १४० कोटी जनतेला होता. इस्रोच्या शास्त्रज्ञांनी अखेर हा विश्वास सार्थ ठरवला. चांद्रयान ३ मोहीम ही भारताच्या दृष्टीने अतिशय महत्वाची होती. भारताचे हे यान चंद्रावर उतरल्याने चंद्रावर यान उतरवण्यात यशस्वी ठरलेल्या काही मोजक्या देशात भारताचा समावेश झाला. या मोहिमेद्वारे आपल्या देशातील विकसीत तंत्रज्ञान जगाला दाखवण्याची संधी मिळाली. अंतराळ तंत्रज्ञान व उद्योग यांची सांगड घालून अर्थव्यवस्थेला गती मिळाली. ही मोहीम यशस्वी झाल्याने भविष्यात चंद्रावर मानव पाठवण्याचे स्वप्न साकार होईल. ही मोहीम यशस्वी झाल्याने भारत अंतराळ क्षेत्रात एक महासत्ता म्हणून उदयास आली एकूणच भारताच्या अंतराळ क्षेत्रात चांद्रयान ३ मोहीम हा मैलाचा दगड ठरली. आपल्या शास्त्रज्ञांनी ही मोहीम यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेतली होती. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी शास्त्रज्ञांनी रात्रीचा दिवस केला. त्यांच्या या मेहनतीला अखेर यश मिळाले आणि आपली ही चांद्रयान ३ मोहीम यशस्वी झाली. चंद्रावर तिरंगा फडककवून भारताने जगाला दाखवून दिले की अंतराळ क्षेत्रात भारत महासत्ता म्हणून उदयास येत आहे. ७८ वर्षांपूर्वी जेंव्हा भारत इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त झाला तेंव्हा भारत सुईचे टोकही बनवू शकणार नाही अशी आपली हेटाळणी केली जायची. जो देश सुईचे टोकही बनवू शकत नव्हता त्या देशाने आज चंद्रावर स्वारी केली आहे हे भारताच्या आजवरच्या सर्व शास्त्रज्ञांचे आणि सरकारचे यश आहे. या यशाचा देशातील १४० कोटी देशवासीयांना सार्थ अभिमान आहे. चंद्रावर तिरंगा फडकावून अंतराळ क्षेत्रात महासत्ता होण्याच्या दृष्टीने पाऊल टाकणाऱ्या सर्व भारतीयांना राष्ट्रीय अंतराळ दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

सिंगापूरच्या लेखिका नीला बर्वे

# कोवळं ऊन या कथा संग्रहाचे आज प्रकाशन

मुंबईचे सांस्कृतिक केंद्र समजल्या जाणाऱ्या विलेपार्ले येथे नीलाजी यांचा जन्म झाला. घरात सर्वांना वाचनाची अत्यंत आवड. आजीसुद्धा खूप पुस्तके वाचायची, त्याबद्दल सांगायचीही! पार्ले टिळक शाळा आणि टिळक मंदिर या दोन संस्थांनी त्यांचं बालपण समृद्ध केलं. शाळेत अभ्यास आणि खेळ, सूर्यनमस्कार या सर्वांना सारखाच न्याय असे. त्यामुळे मानसिक आणि शारीरिक जडणघडण उत्तम झाली. तिथेच बी.एससी. पर्यंत शिक्षण झाले. पदवीनंतर आवड म्हणून भारतीय विद्याभवन येथे पत्रकारितेचा कोर्स केला. तेथे द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. टाइम्स ऑफ इंडियामध्ये लेखी आणि तोंडी परीक्षा उत्तीर्ण होऊन नोकरीसाठी पत्र आले पण त्याचवेळी लग्न ठरल्याने, बॉण्ड लिहून देता आला नाही आणि आत्यंतिक आवड असलेली नोकरी मुकली ही खंत त्यांना कायम राहिली.

त्यानंतर नीलाजी पार्ले टिळक विद्यालय येथे शिक्षिका म्हणून रुजू झाल्या. लग्न होऊन ठाण्याला गेल्या आणि तेथून रोज सकाळी येत होत्या त्यामुळे शाळेतर्फे बी.एड. करून कायमची शिक्षिका म्हणून तेथे रुजू होण्याची संधी नाकारावी लागली. कारण रोज ठाणे येथून, पहाटे साडेतीन वाजता उठून, सकाळी साडेसहाला पार्ल्याला येणे कायम जमेल असे वाटले नाही. बँकेच्या परीक्षा दिल्या होत्या आणि सर्वच परीक्षा उत्तीर्ण होऊन जेव्हा नियुक्तीपत्रे आली तेव्हा सर्वांच्या सल्ल्यानुसार स्टेट बँक ऑफ इंडियाची नोकरी स्वीकारली. तीही तशी दूर म्हणजे फोर्ट विभागात होती.

नोकरी आणि घरचे काम सांभाळून लेखनाची आवड जपत नीलाजी या काही वृत्तपत्रांमध्येही लेखन करीत.

तसेच घरी काही वर्षे त्यांनी मुलांच्या शिकवण्या घेतल्या.सोबतच पर्यावरण विषयक काम करणाऱ्या हरियाली या स्वयंसेवी संस्थेचे , ग्रंथालीचे , व्यायाम शाळेचे, शुभंकरोति संस्थेचे अशा विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत.

कर्तृत्ववान परंतु समाजापुढे न आलेल्या ठाण्यातील महिलांचा शोध घेऊन त्यांच्यावर नीलाजींनी एका वृत्तपत्रासाठी लेखमाला लिहिली. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला.

बँकेची नोकरी म्हणजे सतत आकड्यांची जुळवाजुळव, पण नीलाजींनी आयुष्यभर आकड्यांची यशस्वीपणे जुळवाजुळव करीत असतानाच आपलं अक्षरप्रेम कधीच कमी होऊ दिलं नाही. बँकेमध्ये बदली होणाऱ्या व सेवानिवृत्त होणाऱ्या प्रत्येकासाठी कवितेमधून निरोप देण्याची पद्धत त्यांनी सुरू केली. आजही प्रत्येकाकडे आपापली कविता आहे.

मुले मोठी झाल्यावरच नीलाजींनी प्रमोशन घेतले. बँकेत अनेक महत्त्वाची कामे सांभाळली. त्यात गृहकर्जे आणि त्यानंतर बँकेच्या सुवर्ण व्यवसायाची जबाबदारी आणि विविध योजना. त्यानंतर नीलजींची गोव्यात बदली झाल्यावर व्यवस्थापकाच्या पदाबरोबरच येणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी उत्तमरीतीने निभावल्या. शिवाय वेळ काढून काही वृत्तपत्रातही लिखाण केले. पणजी आकाशवाणीवरून कविता, नाट्यछटा, लेख सादर झालेच पण बँकेविषयी माहिती आणि जागृतता यावरही काही भाषणे झाली.

गोवा दूरदर्शनवरूनही त्यांचे कार्यक्रम झाले. गोव्यातील

विविध काव्यसंमेलनांची त्यांना आमंत्रणे असत.

नीलाजींचा रानफुले हा काव्यसंग्रह पद्मश्री प्रसाद सावकार यांच्याहस्ते प्रकाशित झाला आहे.

नीलाजींच्या सेवानिवृत्तीला काही वर्षे असताना एका दुर्घटनेत त्यांच्या पतीचे निधन झाले. त्यावेळी त्या गोव्यात ग्रामीण भागांत शाखाप्रमुख होत्या.पुढे नीलाजी सेवानिवृत्त झाल्यावर स्टेट बँकेने तसेच गोव्यातील काही सहकारी बँकांनी, तसेच काही वृत्तपत्रांनीही त्यांच्याकडे रुजू होण्याविषयी विचारले. पण मुलगा राहुल ,जो मद्रास आयआयटी मधून एम टेक झाला आहे, त्यास हे कळताच त्याने त्यांना सिंगापूरला बोलावून घेतले आणि यापुढे तू नोकरी करायची नाही, खूप केलेस आत्तापर्यंत ,आता तुझे राहून गेलेले छंद पुरे करायचे असे सांगितले.

नीलाजींचे प्रांजळ मत आहे की, जर दुसऱ्या देशात कायमचे रहायला जायचे असेल तर तरुण वयात जावे. नोकरी, वाढता संसार, नव्या जागीं सेटल होण्यास धडपड होते, पण १०-१५ वर्षांत तिथलेच होऊन जातो. सारे आयुष्य एका देशात गेल्यावर, अनेक वर्षांचे स्नेहबंध सोडून दुसरीकडे जुळवून घेणे कठीण जातेच . सारा वेळ मोकळा पण बाकी कोणी नाहीत मोकळे आपल्याबरोबर संवाद साधण्यास. काही मित्रपरिवाराच्या कथा ऐकल्या होत्या. त्यांचे म्हणणे... थोडे दिवस ठीक आहे, जातो वेळ इकडेतिकडे फिरण्यात पण नंतर बोअर होते. त्यांची आपली संस्कृती, खाणे-पिणे, सारेच वेगळे. कसे जुळवून घेणार या वयात? आणि परत आले भारतात. पण त्यामुळे मुलांना काळजीच.नीलाजींनी मात्र ठरविले, मुलाला असल्या टेन्शनमध्ये अडकवायचे नाही. त्याची अपेक्षा किती माफक होती की, आईने निव्वळ आनंदात रहावे! त्याप्रमाणे त्यांनी सिंगापूर महाराष्ट्र मंडळातील उपक्रमांत भाग घेण्यास सुरुवात केली. तसेच या देशाने आधार दिला म्हणून तेथील लोकांसाठी काम करणे हे कर्तव्यच आहे असे मानून विविध संस्थांमध्ये स्वयंसेवक म्हणून काम करण्यास सुरुवात केली. आरएसव्हीपी सिंगापूर (ज्येष्ठ स्वयंसेवकांची संस्था) या संस्थेत सहभागी होऊन त्यांच्यातर्फे नॅशनल हार्ट हॉस्पिटल, स्त्रिया आणि मुलांसाठी असलेले के. के. हॉस्पिटल, वृद्धाश्रम, इंडियन हेरिटेज अशा निरनिराळ्या ठिकाणी स्वयंसेवक म्हणून जाऊ लागल्या. तसेच खेळांची आवड असल्याने ॲक्टिव्ह एसजी या सिंगापूरच्या क्रीडा संस्थेमध्ये सभासद होऊन निरनिराळ्या खेळांच्या स्पर्धेसाठी स्वयंसेवक म्हणून सेवा देऊ लागल्या. आंतरराष्ट्रीय रग्बीसाठी स्वयंसेवक म्हणून काम करताना विदेशातील ८ टॉपमोस्ट टीम्सच्या खेळाडूंच्या स्पर्धा त्यांना बघण्यास मिळाल्या. शिवाय हा खेळ त्या पहिल्यांदाच लाईव्ह बघत असल्याने त्याचे नियम, स्किल इ. सर्व समजावून घेण्याची संधी त्यांना मिळाली. नॅशनल व्हॉलीबॉल चॅम्पिअनशिप, बूनले येथील ॲक्टिव्ह एसजी हॉकी व्हिलेजचा उद्घाटन समारंभ (१७ ऑगस्ट २०१९) येथे फोटोग्राफर म्हणून त्या स्वयंसेवक होत्या.



सिंगापूरला आल्याआल्याच आरएसव्हीपी सिंगापूर या संस्थेला २० वर्षे झाल्याबद्दल त्यांनी लोगो स्पर्धा जाहीर केली होती. एकमेव बक्षिस होते आणि ते २०० डॉलर्स आणि गाला डिनर विथ सिंगापूर प्रेसिडेंट असे होते. नीलाजींची चित्रकलेची आवड उफाळून आली. अथक परिश्रम करून नीलाजी या स्पर्धेत सहभागी झाल्या आणि विशेष म्हणजे प्रथम क्रमांक मिळाला. त्यामुळे त्यांना मुलासह तेथील राष्ट्रपतींना भेटायची संधी मिळाली. या लोगोमुळे संस्थेतही चांगली ओळख झाली.

नीलाजींना कॅरम लहानपणापासून अतिप्रिय. शिवाय त्या ऑल इंडिया कॅरम फेडरेशनच्या पंच. त्यामुळे सिंगापूर सरकारच्या क्रीडा अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांनी हा खेळ सिंगापूरमध्ये लोकप्रिय करायचा आहे, इथल्या मुलांना शिकवायचा आहे म्हणून सांगितले. काही बैठकीनंतर त्यांनी नीलाजींना कॅरमचे २ संच मंजूर केले त्याचप्रमाणे क्लेमेंटी स्पोर्ट्स हॉलमध्ये जागाही दिली. येणाऱ्या मुलांना (वयोगट ८ ते १४ वर्षे ठेवला होता) कॅरम म्हणजे काय खेळ आहे, सोंगट्या, स्ट्रायकर म्हणजे काय इ. पासून शिकविण्यास सुरुवात केली. मुले खेळांत रस घेऊ लागली, काही बऱ्यापैकी खेळू लागले पण हाय रे दैवा! कोरोनाच्या आक्रमणामुळे त्यांचा हा उपक्रम बंद पडला. काही काळाने असोसिएशन ऑफ कॅरम, सिंगापूर या नव्याने सुरू झालेल्या संस्थेतील एकाने संपर्क साधला. २०२२ मध्ये मलेशिया येथे आंतरराष्ट्रीय कॅरम वर्ल्ड चॅम्पिअनशिप आयोजित केली गेली. एसीएसने सिंगापूरतर्फे सहभाग घेतला .तिथे नीलाजींना अम्पायर म्हणून बोलावले गेले. २८ देशांच्या टॉपर्ससाठी अंपायर म्हणून एक आव्हानच ! पण त्यांनी ते एन्जॉय केले आणि तेथेच इंटरनॅशनल रेफ्रीसाठी परीक्षा दिली. ४ प्रकारात होणाऱ्या या परीक्षेत त्या पहिल्या आल्या.

परत आल्यावर नीलाजी २०२३ मध्ये नॅशनल रँकिंगच्या स्पर्धेसाठी चीफ रेफ्री होत्या. खेळण्याचे वैयक्तिक प्रयत्न सुरूच होते. पूर्वीचे नैपुण्य नाही पण मग २०२४ मध्ये नॅशनल रँकिंगमध्ये सहभाग घेतला. त्यात मालदीव येथे झालेल्या आशियाई स्पर्धेसाठी निवड झाली. ही संधी त्याचवेळी त्या भारतात गेल्यामुळे नाही स्वीकारता आली पण त्यानंतर अमेरिका येथे सहाव्या कॅरम विश्वचषक स्पर्धेसाठी पुन्हां निवड होऊन त्या टीमबरोबर गेल्या. खूप चांगले अनुभव मिळाले आणि नुकतीच मे महिन्यात झालेल्या एसीएस नॅशनल स्पर्धेत भाग घेऊन २०२५ आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेण्यासाठी त्यांची निवड झाली आहे.

नीलाजी सिंगापूर महाराष्ट्र मंडळाच्या द्वैमासिकात लिहितात .मंडळातील सर्व साहित्यप्रेमी जमून दर महिन्याला कविता सादर करतात. त्यामुळे कितीही व्यस्त असले तरी कविता लिहिल्या गेल्या, असे त्या आवर्जून सांगतात. या मंडळाच्या सर्व उपक्रमांत स्वयंसेवक म्हणून सक्रिय सहभाग घेतातच पण गणपती उत्सवात एकपात्री अभिनयात भाग घेऊन अभिनयाची हौस आणि गणपतीला निरोप देतेसमयी दीड-दोन तास लेझीम खेळून तीही हौस भागवून घेतात.

नीलार्जीच्या आईवडिलांचे देशावर अफाट प्रेम होते. त्यामुळे त्यांनी ना नफा ना तोटा या तत्त्वावर बहुसंख्य लोकांना भारतदर्शन घडविले. अशी समाजसेवा त्या करू शकत नाहीत पण त्यांच्यामुळे लहानपणापासून त्यांना प्रवास खूप आवडू लागला. त्यामुळे त्या वर्षातून एक-दोन सहली एकटीनेच करतात. विविध अनुभव घेत, विविध जीवनपद्धती अनुभवत लोकांना जाणून घेत भ्रमण करतात. अर्थात यासाठी अचानक उद्भवणाऱ्या समस्यांना तोंड देऊन त्यातून बाहेर पडण्याची मनाची तयारी असते.

नीलाजी कथा, कविता, नाटुकलं, अलक, ललितलेखन, प्रवासवर्णन नियमितपणे लिहीत असतात. विशेष म्हणजे पद्मश्री पुरस्कार मिळालेल्या अद्वितीय व्यक्तींचे ऋण म्हणून, त्यांचे कार्य सर्वांना समजावे म्हणून त्या

न्यूज स्टोरी टुडे या प्रख्यात पोर्टलवर त्यांची साप्ताहिक लेखमाला सुरू आहे. त्या व्हिडीओद्वारे कथा, कविता सादरीकरणहीकरतात. ऑनलाइन उपक्रमांना परीक्षक म्हणूनही असतात. त्यांना बागकामाची आवड असून त्यांनी सुमारे ६० झाडे बाल्कनी व लिफ्टच्या बाजूच्या जागेत लावली आहेत. तसेच एका ग्रुपला त्या मार्गदर्शनही करतात.

सिंगापूरमध्ये भारतीय सण साजरे करताना त्या शेजाऱ्यांना त्या सणांमागील वैज्ञानिक दृष्टिकोन सांगण्याचा प्रयत्न करतात. त्यांनी काढलेल्या रांगोळ्या इमारतीतील लोक आवर्जून बघतात. त्यांची सून सिंगापूर येथील असल्याने, त्यांच्या पद्धती, परंपरा, सण समजावून घेऊन त्यांच्यात सामावून गेल्या आहेत. यांच्याकडे दिवाळीसाठी ज्या माळा लागतात, त्या ख्रिसमस, न्यू इयर, चायनीज न्यू इयर साजरे करीत गुढीपाडव्यापर्यंत लखलखत असतात. सुनेचे माहेर खूप मनमिळावू आहे, त्यांच्या आणि आपल्या संस्कृतीची देवाणघेवाण होत असते. त्यामुळे इथेही स्नेहबंध जुळले. दोन्ही परिवार अनेक ठिकाणी एकत्र जातात, विविध ठिकाणी एकत्र भ्रमण करीत असतात.

अनेक ऑनलाइन कार्यक्रमांचे नीलाजींनी यशस्वी आयोजन केले आहे. आळंदी येथील फुलोरा साहित्य संमेलनात त्या प्रमुख अतिथी होत्या. भारतीय स्त्रीशक्ती, ठाणेतर्फे आयोजित स्वलिखित कथाकथन स्पर्धेत तर 'आभाळाखालची शाळा'तर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय कला महोत्सवमध्ये नाट्य विभागात तसेच शॉपीझन आयोजित कथास्पर्धेत त्यांना प्रथम पारितोषिक मिळाले आहे.

अशा या नीलाजीना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

**लेखनः देवेंद्र भुजबळ**
**९८६९४८४८००**

# अल्पसंतुष्ट राहून आणि मळलेल्या वाटेने जाण्यापेक्षा कोकणातील युवकांनी स्फूर्ती घेऊन उच्च पदावर पोहोचावे - खासदार नारायण राणे

**रायगड -** सार्वजनिक जीवनात व राजकारणात काम करताना मला मिळालेल्या पदांना मी न्याय देण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री असताना राज्यात व देशात मला जो नावलौकिक मिळाला, त्यामागे शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे यांचा हा निर्णय होता, हे मला सांगताना आजही अभिमान वाटतो.मला दिलेल्या संधीचा उपयोग मी नेहमीच जनतेच्या कल्याणाकरिता सामाजिक, शैक्षणिक व विधायक कामांसाठी केला. या काळात कोकणचा खूप विकास झाला, आताही होत आहे, पुढेही होईल असे उदगार खासदार नारायण राणे साहेब यांनी मुंबईत काढले. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने आयोजित वृत्तपत्र लेखक दिनाच्या कार्यक्रमात ते आपले मनोगत व्यक्त करीत होते. ७७ व्या दिनानिमित्त रवींद्र मालुसरे यांनी संपादित केलेल्या प्रेरक शिल्पकार या ग्रंथाचे आणि वृत्तपत्र लेखकांनी सोशल मीडियावर मुक्तपणे आणि निर्भीडपणे व्यक्त व्हावे यासाठी बनविलेल्या जागल्यांचा लोकजागर या ब्लॉगरचे प्रकाशन नारायण राणे यांच्या हस्ते करण्यात आले.

राणे आपल्या भाषणात पुढे असेही म्हणाले की,जीवनात यशस्वी होण्यासाठी आणि उच्च पदावर पोहोचण्यासाठी अल्पसंतुष्ट न राहता सतत संघर्ष केला पाहिजे. मळलेल्या वाटेने जाण्यापेक्षा यशस्वी झालेल्यांपासून स्फूर्ती घेऊन कोकणातील युवकाने पुढे जायला हवे. आयएएस आणि आयपीएस चे प्रमाण अत्यल्प आहे ते भविष्यात वाढायला हवे. त्यासाठी लागणारी संसाधने उपलब्ध करून देण्यासाठी मी तयार आहे. मुलांनी उच्च शिक्षित व्हावे यासाठी मी सिंधुदुर्गात मेडिकल, इंजिनिअर कॉलेज काढले आहे. त्याची गुणवत्ता आता दिसत आहे. यापुढे आर्किटेक्ट असो किंवा अन्य कुणीही त्यांनी आयुष्यातील अपयशाच्या तक्रारीचा सूर न लावता आपली चाकोरी सोडून बाहेर पडायला पाहिजे तरच अधिक पैसे आणि नावलौकिक मिळेल.



देशाच्या तिजोरीत मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असलेले शहर ३४ टक्के हिस्सा उचलते. याचा विचार मुंबई लगत असणाऱ्या कोकणी माणसांनी केला पाहिजे. कोकण हे समृद्ध बनले पाहिजे. मला राज्यात व केंद्रात जी-जी पदे मिळाली, त्याचा उपयोग मी महाराष्ट्राच्या व सिंधुदुर्ग जिल्ह्यात विकासासाठी केला, हे सांगताना मला अभिमान वाटतो.कोकणाच्या विकासाची अशी चर्चा होते, त्यामध्ये माझ्या नावाचाही उल्लेख होतो. त्याचे सर्व श्रेय मी कोकणी माणसालाच देतो. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या कार्यालयीन जागेचा प्रश्न निर्माण झाला आहे. मी सरकारमध्ये असल्याने तुमच्या या मागणीसाठी मी संबंधितांसाठी बोलून तुमचा प्रश्न सोडवायचा प्रयत्न करील. असे आश्वासनही नारायण राणे यांनी सर्व ज्येष्ठ वृत्तपत्र लेखकांना दिले.

संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, २२ ऑगस्ट हा दिवस आम्हा वृत्तपत्र लेखकांसाठी उत्साहाचा आणि आनंदाचा असतो. राणे साहेब बेस्टचे चेअरमन असताना शिंदेवाडी येथील संघाच्या कार्यालयात आले होते. इतके जुने ऋणानुबंध आमचे त्यांच्याशी आहेत. आज हा कार्यक्रम राणे साहेबांची आठवण म्हणून त्याठिकाणी झाला असता, परंतु तेच कार्यालय आमच्याकडून महापालिकेने काढून घेतले आहे. अमृत महोत्सवी वाटचाल करणारी ही चळवळ निरंतर सुरु राहावी यासाठी राणेसाहेबांनी सरकारदरबारी आमच्यासाठी प्रयत्न करावा व मराठी माणसांच्या या संस्थेसाठी जीवदान द्यावे.

यावेळी संघाचे माजी अध्यक्ष मधू शिरोडकर, वि अ सावंत, विजय ना कदम, मनोहर साळवी यांच्यासह मधुकर कुबल, रमेश सांगळे, नितीन कदम, दिगंबर चव्हाण, सुनील कुवरे, राजन देसाई, श्रीनिवास डोंगरे, दिलीप ल सावंत, कृष्णा काजरोळकर,सतीश भोसले, एस एम बी न्यूज चॅनेल्स अँड प्रिंट मीडियाचे अशोक सावंत आदी पदाधिकारी आणि ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक उपस्थित होते.

# राज्यातील हजारो शिक्षकांना प्रतीक्षा प्रमाणपत्राची

## प्रमाणपत्र त्वरित उपलब्ध करून देण्याची हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनची मागणी!

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** राज्यात २ जून २०२५ ते १२ जून २०२५ या कालावधीत शिक्षकांचे वरिष्ठ-निवड श्रेणी प्रशिक्षण घेण्यात आले. शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी देण्यासाठी आधी ऑनलाइन टेस्ट, प्रत्येक तासिकेला उपस्थिती, प्रशिक्षणार्थींची उपस्थित असूनही नावे उपस्थिती पत्रकावर न येणे, तसेच सव्र्हर डाऊन या समस्यांमुळे हे प्रशिक्षण यंदा खूप गाजले होते. शाळा सुरू होण्यापूर्वी हे प्रशिक्षण राजभरातील सर्व शिक्षकांना देण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण करून शिक्षकांनी शासनाच्या निर्देशानुसार संशोधन अहवाल व स्वाध्याय वही वेळेत सादर केली आहे. सर्व आवश्यक टप्पे पूर्ण करून प्रकल्प जमा करूनदेखील आता जवळपास दोन महिने उलटून गेले आहे. तरीदेखील संबंधित शिक्षकांना आजपर्यंत वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रमाणपत्र मिळालेले नाही. प्रमाणपत्र मिळण्यास विलंब का? असा प्रश्न विचारत, प्रमाणपत्रास विलंब शिक्षकांच्या सेवाविषयक प्रश्नांमध्ये होणारा हा विलंब अयोग्य आहे. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सर्व शिक्षकांना वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रमाणपत्र तातडीने उपलब्ध करून द्यावे,




सेवाविषयक प्रगतीस अडथळा ठरत असून त्यांच्या वेतन उन्नती प्रक्रियेत अनावश्यक अडथळे निर्माण होत असल्याचे हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर यांनी म्हटले आहे. प्रमाणपत्र तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी याबाबत आपल्या मागण्यांचे निवेदन संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर यांनी मा.राहुल जी रेखावार सर (संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे) तसेचसचिंद्र प्रताप सिंह (शालेय शिक्षण आयुक्त, पुणे) यांना ईमेल आणि व्हॉट्सप द्वारे पाठविले आहे..

# मराठा कधी रणांगणावर येत नाही पण रणांगणावर आला तर जिंकल्याशिवाय जात नाही - अरविंद घोगरे

## परतूरात मराठा समाजाची बैठक ; मुंबईकडे जाण्याचा निर्धार, जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला समर्थन

**परतूर । प्रतिनिधी -** मराठा बांधव तसे पाहता एकत्र येत नाहीत व एकत्र आले की, कुणाच्याच बापाला भीत नाहीत. असे वातावरण महाराष्ट्रभर संघर्योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या गरजवंत लढ्यामुळे तयार झालेले आहे. त्यामुळे आता पाटलांच्या नेतृत्वात ही शेवटची लढाई आहे त्यामुळे मराठा कधी रणांगणावर येत नाही पण रणांगणावर आला तर जिंकल्याशिवाय जात नाही. असे मत शिवशाहीर अरविंद घोगारे यांनी व्यक्त केले. ते परतूर येथे मराठा बांधवांच्या चलो मुंबई या बैठकीत मार्गदर्शन करत होते.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या व समाजाच्या इतर मागण्यांसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी महाराष्ट्रातील सर्व मराठा बांधवांना २७, २८ व २९ ऑगस्ट रोजी चलो मुंबई चा नारा दिला. त्यानिमित्ताने त्यांच्या या आंदोलनाला भक्कम पाठिंबा देण्यासाठी परतूर तालुक्यातील मराठा बांधव मोठ्या संख्येने मुंबई गाठणार असल्याचा ठाम निर्धार गुरुवारी दि. २० रोजी मराठा क्रांती भवन, परतूर येथील झालेल्या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

मुंबई येथील मराठा आरक्षण आंदोलनासाठी परतूर तालुक्यात नियोजन बैठकीला



शिव शाहीर अरविंद घोगरे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी बैठकीचे मुख्य आकर्षण ठरले महाराष्ट्रभर आपल्या प्रभावी काव्यमय शैलीतून समाजप्रबोधन करणारे शिवशाहीर शिवश्री अरविंदजी घोगरे पाटील. आपल्या जाज्वल्य भाषणातून त्यांनी मराठा समाजाच्या इतिहासातील शौर्य आणि आजच्या संघर्षाची जोड देत उपस्थितांना प्रेरित केले.

शिवशाहीर पुढे म्हणाले की, आज या देशात लोकशाही खरी जिवंत आहे की नाही असा प्रश्न पडतो. कारण तब्बल दोन वर्षांपासून सहा कोटी मराठा समाज एका मागणीसाठी रस्त्यावर आंदोलन करतोय. मात्र आता सत्ताधाऱ्यांनी समाजाच्या भावनांचा विचार केला नाही तर आम्ही त्यांना दाखवून देऊ की आम्ही मराठा आहोत आणि आम्ही जिवंत ही आहोत. त्याच बरोबर त्यांनी स्पष्ट शब्दांत सरकारला इशारा दिला की, फडणवीसांनी कितीही डाव टाकले तरीही ते उलथवून टाकण्याची ताकद मनोज जरांगे पाटलांकडे आहे, असं सांगत त्यांनी जरांगे पाटलांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. म्हणूनच महाराष्ट्रातील मराठा बांधव जसे मुंबईकडे कूच करणार आहेत त्याच टाकतीने परतूर तालुक्यातील सर्वांनी बिनशर्त पटलांना साथ द्यायची आहे. आणि मुंबईला मोठ्या संख्येने उपस्थित राहायचं आहे, असं आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या बैठकीत प्रत्येकाने बिनशर्त साथ देत मोठ्या संख्येने मुंबईला पोहोचून आंदोलन बळकट करायचे असे ठरले.

ही बैठक परतूर तालुक्यातील मराठा समाजाच्या संघटित शक्तीचे द्योतक ठरली असून सर्वांच्या एकमुखी निर्धारामुळे हे आंदोलन ऐतिहासिक ठरणार आहे याची खात्री व्यक्त करण्यात आली.

याप्रसंगी श्री. किशोर आबा मरकड, गणेश दादा शिंदे, बळीराम मोरे, नंदू दाभाडे, संभाजी देशमुख आदींनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी एक मराठा लाख मराठा, लढेंगे जितेंगे, हम सब जरांगे, आता कुठे जायचंय ? मुंबईला जायचंय!, जय जिजाऊ, जय शिवराय ! अशा घोषणांनी वातावरण दणाणून गेले. बैठकीला शअरविंद घोगरे, श्री. किशोर आबा मरकड, गणेश दादा शिंदे, ज्ञानेश्वर माऊली उढाण,बळीराम मोरे, नंदू दाभाडे, संभाजी देशमुख यांच्यासह तालुक्यातील शेकडो मराठा बांधवांची उपस्थिती होती.

# जालना जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना जाहीर

**जालना । प्रतिनिधी -** राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाच्या प्रधान सचिव यांच्या १२ जून २०२५ रोजीच्या आदेशानुसार जालना जिल्हा परिषदेच्या ५७ जागा आणि त्याअंतर्गत भोकरदन-२२, जाफ्राबाद-१२, बदनापूर-१०, जालना-१८, मंठा-१२, परतूर-१०, घनसावंगी-१४ व अंबड-१६ अशा एकूण जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या ११४ जागांसाठी निवडणूक प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार आज दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध होणार आहे. ही अधिसूचना जालना जिल्हाधिकारी कार्यालय, जालना जिल्हा परिषद कार्यालय, सर्व उपविभागीय कार्यालये, सर्व तहसील कार्यालये आणि सर्व पंचायत समिती कार्यालयांतील फलकांवर नागरिकांच्या अवलोकनासाठी उपलब्ध असेल. सर्व संबंधितांनी अंतिम प्रभाग रचनेचे अवलोकन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

## आजचे राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल राहील. कामाच्या ठिकाणी तुमचे प्रयत्न यशस्वी होतील, परंतु खर्च वाढण्याची शक्यता आहे, त्यामुळे खर्चावर नियंत्रण ठेवा. आर्थिक नियोजन करणे महत्त्वाचे आहे. कुटुंबातील सदस्यांसोबतचे संबंध चांगले राहतील.

**वृषभ :** आज तुमच्या मेहनतीला चांगले फळ मिळेल. व्यवसायात आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. तुमच्या कामात यश मिळाल्याने तुमचा आत्मविश्वास वाढेल. कुटुंबातील सदस्यांचे सहकार्य मिळेल. आरोग्याची काळजी घ्या.

**मिथुन**: आजचा दिवस कौटुंबिक बाबींसाठी चांगला आहे. कुटुंबासोबत चांगला वेळ घालवल्याने मानसिक समाधान मिळेल. काही कामांसाठी प्रवास करावा लागू शकतो. आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे, विशेषतः खाण्यापिण्याकडे लक्ष द्या.

**कर्क**: आज तुम्हाला नवीन संधी मिळतील. पण, कोणताही मोठा निर्णय घेण्यापूर्वी नीट विचार करा. घाईत घेतलेले निर्णय चुकीचे ठरू शकतात. कामाच्या ठिकाणी वरिष्ठांशी संबंध चांगले ठेवा.

**सिंह**: आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी सन्मान मिळेल. तुमच्या कामाची प्रशंसा होईल. प्रेमसंबंधांमध्ये असलेल्यांसाठी दिवस चांगला आहे. आरोग्याच्या बाबतीत काही समस्या जाणवू शकतात, त्यामुळे काळजी घ्या.

**कन्या** : आज तुम्हाला काही अडथळ्यांचा सामना करावा लागू शकतो, पण तुम्ही तुमच्या हुशारीने त्यावर मात कराल. अनावश्यक खर्च टाळा. तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करा.

**तुळ**: आज तुमची आर्थिक स्थिती सुधारेल. गुंतवणुकीसाठी दिवस चांगला आहे. नवीन काम सुरू करण्याचा विचार करत असाल, तर हा दिवस योग्य आहे. कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील.

**वृश्चिक** : आज तुम्हाला काही महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील. तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. कुटुंबातील सदस्यांकडून मदत मिळेल. मानसिक शांतता राखण्याचा प्रयत्न करा.

**धनु**: आज अचानक प्रवास घडण्याची शक्यता आहे. प्रवासामुळे थोडा थकवा जाणवू शकतो. आर्थिक व्यवहारात सावधगिरी बाळगा. आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**मकर**: आज तुमच्या कामाला ओळख मिळेल आणि वरिष्ठांकडून तुम्हाला प्रशंसा मिळेल. तुमच्या कामातील समर्पण पाहून लोक प्रभावित होतील. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**कुंभ** : आज नवीन लोकांशी संपर्क होईल. हे संपर्क भविष्यात तुमच्यासाठी फायदेशीर ठरतील. कामाच्या ठिकाणी सकारात्मक वातावरण राहील. आरोग्याच्या दृष्टीने दिवस चांगला आहे.

**मीन**: आज तुम्हाला शांत आणि सकारात्मक राहण्याची गरज आहे. कोणत्याही वादापासून दूर राहा. आरोग्याची काळजी घ्या. नवीन कामाची सुरुवात करण्यापूर्वी विचार करा.

# जालना येथे २६ ऑगस्ट रोजी प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन

## नोकरीच्या शोधात असलेल्या जालना जिल्ह्यातील युवक-युवतींसाठी विशेष मोहिम

**जालना । प्रतिनिधी -** नोकरीच्या शोधात असलेल्या जालना जिल्ह्यातील युवक-युवतींना विविध खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग-व्यवसाय आणि आस्थापना यांचेकडील रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या उद्देशाने तसेच रोजगार सहाय्यासाठी विशेष मोहिम सुरू करण्यात आली आहे. याप्रमाणे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे मार्फत जालना येथे दिनांक २६ ऑगस्ट २०२५ मंगळवार रोजी प्लेसमेंटड्राईव्ह -जागेवर निवड संधी चे आयोजन सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत करण्यात आले आहे.

यासाठी बजाज ऑटो प्रा.लि.छत्रपती संभाजीनगर चे अप्रेंटिस करिता आय. टी. आय.कोणताही ट्रेड / डिप्लोमा उत्तीर्ण साठी २० पदे, डिप्लोमा कोणताही ट्रेड उत्तीर्ण साठी टेक्नीशियनची २० पदे तसेच मेकॅट्रॉनिक्स डिप्लोमा करिता आय टी आय / डिप्लोमा चे २० पदे त्याचप्रमाणे टाटा मोटर्स प्रा.लि. पुणे यांचे ऑपरेटर पदाकरिता बारावी पास, आय.टी. आय / डिप्लोमा उत्तीर्ण साठी ५० पदेअशी एकूण ११० रिक्तपदे प्राप्त झालेली आहेत.

याकरीता नोकरी इच्छुक पात्रता धारक उपस्थित होणा-या उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येवून जागेवरच निवडीची संधी उपलब्ध आहे. विशेष म्हणजे कमवा आणि शिका योजने अंतर्गत पुणे येथे मेकॅट्रॉनिक्स डिप्लोमा करताना बेरोजगार उमेदवार यांना स्टायपेंड मिळणार आहे त्यामध्ये मोफत बस सुविधा,जेवण यांचा समावेश असून त्याच ठिकाणी त्यांना नोकरीची संधी देखील मिळणार आहे. जालना जिल्ह्यातील नोकरी इच्छुकांनी या संधीचा लाभ व अधिक माहिती घेण्यासाठी विभागाच्या ृ.ीक्षसरी.ारहरीुरूरा.सें्.ळप या वेबसाईटला भेट द्यावी.

त्याच प्रमाणे केंद्र शासनाच्या एन.सी.एस. पोर्टलवर रजिस्ट्रेशन करण्यासाठी देखील ृ.पली.सें्.ळप या संकेतस्थळावर नोंदणी करावी. यापूर्वी नोंदणी केली नसल्यास प्रथम आपली नोंदणी करावी आणि होम पेज वरील नोकरी साधक (गेल ङ्शशज्ञरी) लॉगिन मधून आपल्या युजर आयडी पासवर्ड च्या आधारे लॉगिन करावे. त्यानंतर डॅसबोर्ड मधील पंडित दीनदयाळ उपाध्याय जॉब फेअर या बटनावर क्लिक करून जालना जिल्हा निवडून त्यातील झडएउएचएछद्ध उछखतए (२०२५-२६) गङछ ०३ याची निवड करावी किमान दोन प्रतीत बायोडाटासह फोटो,शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, इ.कागदपत्रे कंपनींना देण्यासाठी छायाप्रती संच सोबत ठेवून दिनांक दिनांक २६ ऑगस्ट मंगळवार रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय जालना ४३१२०३ येथे उपस्थित राहून या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये सहभागी व्हावे आणि रोजगाराच्या या पर्वणीचा निश्चित लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, जालना यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

पान १ वरुन

## पोलीस अधिकाऱ्याच्या ...

सत्यतेची तपासणी करणे, त्यामागील हेतू शोधणे आणि बदनामीचा प्रयत्न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे. केवळ व्हिडिओवर आधारित मत न बनवता, दोन्ही बाजूंचे म्हणणे आणि घटनेची संपूर्ण माहिती जाणून घेणे हेच योग्य ठरते. यामुळे भविष्यात अशा पद्धतीचा गैरवापर रोखता येईल आणि पोलिस दलासारख्या महत्त्वाच्या संस्थांची प्रतिमा सुरक्षित ठेवता येईल.

## पोलीस उपअधीक्षक ...

गेली. या क्षणी, कोणताही विलंब महागात पडू शकला असता. पोलिस प्रशासनाने अशा प्रसंगांसाठी विशेष प्रशिक्षण दिलेले असते, जिथे वेळेवर योग्य निर्णय घेऊन संभाव्य धोका टाळणे महत्त्वाचे असते. कुलकर्णी यांनी नेमके हेच केले.

अनेकदा, पोलिसांना अशा परिस्थितीत कठोर आणि प्रसंगी कठोर दिसणाऱ्या कृती कराव्या लागतात. त्यामागे वाईट हेतू नसतो, तर जनतेला आणि स्वतःला सुरक्षित ठेवण्याचा उद्देश असतो. कुलकर्णी यांच्या कारवाईमुळे गोपाल चौधरी यांचा जीव वाचला आणि परिसरातील सुरक्षा धोक्यात आली नाही. पोलिसांनी या प्रकरणात केवळ परिस्थिती हाताळली नाही, तर योग्य कायदेशीर कारवाई करून आंदोलकावर गुन्हाही दाखल केला, जे कायद्याचे पालन दर्शवते.

या घटनेतून, पोलीस उपअधीक्षक अनंत कुलकर्णी यांनी त्यांच्या कर्तव्यदक्षतेचे आणि धैर्यशील नेतृत्वाचे उत्कृष्ट उदाहरण सादर केले आहे. त्यांच्या या कृतीकडे केवळ एका व्हिडिओ क्लिपमधून न पाहता, त्यामागील संपूर्ण परिस्थिती आणि पोलिसांच्या भूमिकेच्या व्यापक संदर्भातून पाहणे आवश्यक आहे.

## भ्रष्ट यंत्रणेचा ...

लपवला गेला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ९ ऑगस्ट रोजी दोषींवर एफआयआर दाखल करण्याचे आदेश दिले होते, या घोटाळ्यातील आरोपींमध्ये महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी, संगणक ऑपरेटर आणि नेटवर्क इंजिनियर यांचा समावेश आहे. निवासी जिल्हाधिकारी यांना ७४ पैकी किंवा २८ लोकांवर का गुन्हे दाखल केले असे विचारणा केली असता त्यांच्याकडे कोणतेही उत्तर नाही परंतु आम्ही अंबड उपविभागीय अधिकारी अर्थात एसडीएम यांना गुन्हे दाखल करण्यासंदर्भात सूचना केलेली आहे तेच गुन्हे दाखल करायला टाळाटाळ करत आहे अशा प्रकारची चाल ढकल निवासी जिल्हाधिकारी करत आहेत असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी नेमलेल्या त्रिसदस्यीय चौकशी समितीने दिलेल्या अहवालानुसार २१ तलाठ्यांना निलंबित करण्यात आले होते, तर इतरांविरुद्ध विभागीय चौकशीचे प्रस्ताव पाठविण्यात आले होते. आतापर्यंत ५ कोटी ७४ लाख रुपये वसूल झाले आहेत, पण मोठी रक्कम वसूल करणे बाकी आहे. लोणीकर यांनी निवासी जिल्हाधिकाऱ्यांची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून या घोटाळ्याची खरी व्याप्ती समोर येईल. ते म्हणाले, शेतकरी आत्महत्या करत असताना त्यांच्या हक्काच्या पैशावर भ्रष्ट अधिकारी डल्ला मारत आहेत, ही लज्जास्पद बाब आहे. निवासी जिल्हाधिकारी हे जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख असल्याने त्यांची जबाबदारी मोठी आहे, पण त्यांनी ही जबाबदारी पार पाडण्याऐवजी भ्रष्टाचाराला खतपाणी घातले आहे.

## रविवारी फोटोग्राफी ...

कोणत्याही गोष्टींवर लक्ष केंद्रित केलेल्या रिल ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. फोटोग्राफी स्पर्धेत देखील याच अटी लागू असून धूसर किंवा निकृष्ट दर्जाचे फोटो स्वीकारले जाणार नाहीत.

या दोन्ही स्पर्धेत उत्तम ठरलेल्या विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. विजेत्यांची घोषणा २८ ऑगस्ट रोजी करण्यात येणार आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा शहरातील फोटोग्राफर आणि तरुणाईला आपली कला सादर करण्याची उत्तम संधी ठरणार आहे. मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन वीर सावरकर गणेश मंडळ व पैलवान ग्रुपतर्फे करण्यात आले आहे.

## ग्रामपंचायततर्फे ...

दिवशी ही सर्व बैल घेऊन शेतकरी सदू बाबा या दर्ग्यावर जातात आणि तेथे बैलांना घेऊन प्रदक्षिणा केल्या जाते ही गावची ऐतिहासिक पद्धत आहे. अडीचशे वर्षापासून ही परंपरा कशी चालू आहे. सर्व मानाचे बैल गावातील गढीच्या वेशी मध्ये दातात तिथे त्यांची मनाची पूजा होते आणि नंतर ही सर्व मानाची बैल प्रत्येक मानकरांच्या घरी आणि गावात मिरवणुकीने प्रत्येकाच्या घरी जाऊन पूजा केली जाते. विशेष म्हणजे गावातील सर्व बैल नातेवाईकांच्या घरी जाऊन पूजा केली जाते. जाफराबाद तालुक्यातल्या पंचक्रोशीमध्ये टेंभुर्णी चा पोळा हा ऐतिहासिक पद्धतीने अशा पद्धतीने भरवल्या जातो.

यावर्षी सुद्धा ग्रामपंचायत च्या वतीने सरपंचाचे प्रतिनिधी गौतम मस्के यांच्या वतीने ग्रामपंचायत मध्ये सर्व पोळ्याच्या मानकर यांचा सत्कार करण्यात आला त्याचबरोबर गावचे नवीन आलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भारती साहेब तसेच सहाय्यक निरीक्षक यांचा सुद्धा या ठिकाणी सत्कार करण्यात आला. ज्यांची पूजेची ताट असतात त्यांचा सुद्धा या ठिकाणी सत्कार करण्यात आला. यामध्ये देवराव देशमुख, होऊसराव भगवंतराव देशमुख, दुर्गादास देशमुख, हौसेराव देशमुख गढीवले, भीमराव जमदाडे रामराव जमदाडे, चंद्राच्या शेरीचे मानकरी गजानन अंधारे, तसेच टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भारती साहेब, त्यांचे सहाय्यक, तसेच ज्यांची पूजेची ताटा असतात असे सुरेश आवटी, सुरेश जाधव, गवळी यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. तीनही ठिकाणी पोलीस बंदोबस्त उत्तम होता. तीनही विश्व मध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भारती साहेब जातीने हजर होते. त्यांच्या पोलीस स्टेशनची सर्व टीम तीनही ठिकाणी उपस्थित होती. अनेक ठिकाणी त्यांचा सत्कार करण्यात आला.

## चेक बॉन्स प्रकरणात नोटीस देण्यासाठी मुदतवाढ द्यावी - अँड. महेश धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** पोस्ट ऑफीस सॉफ्टवेअर अपडेट व रक्षाबंधन सणामुळे दि. १ ऑगस्ट पासुन पोस्ट ऑफीस या कार्यालयाने टपाल स्वीकारले नसल्याने अनेक प्रकरणात ज्यामध्ये नोटीस मुदतीत देणे बंधनकारक होते त्या प्रकरणात नोटीस देता आली नाही, उदाः चेक बाऊण्स प्रकरणात धनादेश अनादरीत झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत नोटीस देणे बंधनकारक आहे. धनादेश अनादरीत झाल्यानंतर ज्या लोकांचे ३० दिवस हे १ ऑगस्ट ते १० ऑगस्ट दरम्यान आले, त्या लोकांना निगोशिएबल इस्ट्रमेंट ॲक्ट प्रमाणे नोटीस देता आली नाही म्हणुन अनेकांनी उशिराने नोटीस दिल्याने भविष्यात न्यायालयात प्रकरण दाखल करतांना अडचण येऊ नये म्हणुन मा. मुख्यमंत्री यांनी केंद्र शासनाकडे किंवा स्वतः परिपत्रक काढुन मुदत वाढ द्यावी यासाठी अँड. महेश सिताराम धन्नावत, कार्याध्यक्ष नोटरी असोसिएशन जालना यांनी जिल्हाधिकारी, जालना यांच्या मार्फत मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे. जर मुदतवाढ देण्यात आली, तर अनेक लोकांना न्याय मिळेल, अशी अपेक्षा अँड. धन्नावत यांनी व्यक्त केली.




# ‘सीमाएं सिर्फ दिमाग में होती हैं, उम्र में नहीं’

## ८० व्या वर्षी एव्हरेस्ट आणि ७९ व्या वर्षी अन्नपूर्णा सर करणारे सत्यदेव वर्मा

‘माणसाने एकदा मनात ठरवले की, तो काहीही करू शकतो.’ हे वाक्य तंतोतंत खरे करून दाखवले आहे ज्येष्ठ गिर्यारोहक सत्यदेव वर्मा यांनी. वयाच्या ७९ व्या वर्षी अन्नपूर्णा बेस कॅम्प आणि ८० व्या वर्षी एव्हरेस्ट बेस कॅम्प यशस्वीरित्या पूर्ण करून त्यांनी हे सिद्ध केले आहे की, ‘वय’ हा केवळ एक आकडा आहे. याच धाडसी अनुभवावर आधारित त्यांची ही खास मुलाखत.

**मुलाखतकारः गोविंदप्रसाद मुंदडा**

**प्रश्नः** एव्हरेस्ट बेस कॅम्प आणि अन्नपूर्णा बेस कॅम्प तुम्ही कधी पूर्ण केला?

**सत्यदेव वर्माः** मी अन्नपूर्णा बेस कॅम्प २४ मार्च ते ४ एप्रिल २०२५ या कालावधीत आणि एव्हरेस्ट बेस कॅम्प १४ एप्रिल ते २८ एप्रिल २०२५ या कालावधीत पूर्ण केला.

**प्रश्नः** अन्नपूर्णा बेस कॅम्प आणि एव्हरेस्ट बेस कॅम्पमध्ये नेमका काय फरक आहे?

**सत्यदेव वर्माः** हिमालय ही एक विशाल पर्वतशृंखला आहे. जगातील सर्वात उंच शिखर ‘एव्हरेस्ट’ याच शृंखलेत येते. पूर्वी याला ‘सागर माथा’ म्हणायचे, पण ब्रिटिश लोकांनी याला ‘एव्हरेस्ट’ असे नाव दिले. एव्हरेस्ट बेस कॅम्पची उंची ५३६४ मीटर आहे, तर अन्नपूर्णा कॅम्पची उंची ४१३० मीटर आहे. त्यामुळे एव्हरेस्ट कॅम्पची उंची जास्त आहे. मात्र, अन्नपूर्णाचा ट्रेकिंग मार्ग एव्हरेस्टपेक्षा अधिक कठीण आहे. म्हणूनच इथे कमी पर्यटक येतात.

**प्रश्नः** तुम्हाला ट्रेकिंग करण्याची प्रेरणा कुठून मिळाली?

**सत्यदेव वर्माः** माझे पुण्यातील मित्र कुंज टीबरेवाल हे याआधी जाऊन आले होते. त्यांनी मला त्यांचे फोटो पाठवले. ते पाहूनच मी ठरवले की, मी सुद्धा हे ट्रेकिंग करेन.

**प्रश्नः** एवढ्या मोठ्या शिखरांवर जाऊन तुम्हाला कसा अनुभव आला?

**सत्यदेव वर्माः** एव्हरेस्ट पूर्ण करून आल्यावर मला जाणवले की माझे वय ५ वर्षांनी कमी झाले आहे. आणि अन्नपूर्णा पूर्ण केल्यानंतर पुन्हा ५ वर्षांनी वय कमी झाल्यासारखे वाटले. या अनुभवांमुळेच मी आता ठरवले आहे की, आयुष्यात दरवर्षी वेगवेगळे ट्रेकिंग पॉईंट पूर्ण करायचे आणि सर्व १८ पॉईंट्स पायीच सर करायचे.




**प्रश्नः** तुमच्या टीममध्ये सर्वात ज्येष्ठ सदस्य कोण होते?

**सत्यदेव वर्माः** दोन्ही ट्रेकिंगमध्ये सर्वात जास्त वयाचा मीच होतो. एव्हरेस्ट कॅम्पमध्ये माझ्यासोबत १८ वर्षांचा एक तरुण मुलगा होता, तर अन्नपूर्णा कॅम्पमध्ये सर्वात कमी वयाचा सदस्य २२ वर्षांचा मुलगा होता. आमच्यासोबत काही महिला सदस्यही होत्या.

**प्रश्नः** तुमच्या कुटुंबाने या ट्रेकिंगला संमती दिली होती का?

**सत्यदेव वर्माः** माझा मुलगा अरविंद लॉस एंजेलिसमध्ये राहतो, सून शुभी पुण्यात आहे. मुलगी मनीषा आणि जावई पराग पुण्यातच आहेत. सुरुवातीला माझ्या मुलाने माझ्या जाण्याला तीव्र विरोध केला होता, पण मी ठाम होतो आणि गेलो. २६ एप्रिल २०२५ रोजी मी सुखरूप परतलो, त्याच दिवशी माझ्या मुलाचा वाढदिवस होता. तो म्हणाला, तुम्ही माझ्या वाढदिवसाला सुखरूप परत आलात, हीच माझ्यासाठी सर्वात मोठी भेट आहे. नंतर दुसऱ्या ट्रेकसाठीही त्याने विरोध केला, कारण तो मार्ग खूप अवघड होता, पण मी ऐकले नाही आणि सुखरूप परतलो.

**प्रश्नः** या वयात एवढी मोठी ट्रेकिंग करताना तुम्हाला भीती वाटली का?

**सत्यदेव वर्माः** नाही, मला अजिबात भीती वाटली नाही. मी आधीच चालायचा आणि धावण्याचा भरपूर सराव करून गेलो होतो.

**प्रश्नः** वाचकांना तुमचा काय संदेश आहे?

**सत्यदेव वर्माः** माझा संदेश हाच आहे की, माणसाने एकदा मनात ठरवले की तो काहीही करू शकतो. सीमाएं सिर्फ दिमाग में होती है, उम्र में नहीं कारण, वय हा फक्त एक आकडा आहे. ज्येष्ठ नागरिकांनीही एकदा हिमालयावर जाऊन एक अविस्मरणीय अनुभव घ्यावा आणि आपला आत्मविश्वास हिमालयाएवढा वाढवावा. ज्यांना या संदर्भात मार्गदर्शन हवे असेल, ते माझ्याशी ९८८१७४४०६९ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

## पंचशिल धम्म ध्वज यात्रा आज जालन्यात

### नागपूर ते चैत्यभुमी दरम्यान पू.भन्ते विनाचार्य साधणार जनसंवाद

**जालना । प्रतिनिधी -** महाबोधी महाविहार मुक्त झाला पाहिजे यासाठी नागपूर ते चैत्यभमी पर्यंत भंते विनायचार्य यांची पंचशील धम्म ध्वज यात्रा ही दि. १६ ऑगस्ट २०२५ पासून सुरु झाली असून ती आज शनिवार दि. २३ ऑगस्ट २०२५ रोजी जालना शहरात दाखल होणार आहे. नागपूर दीक्षाभूमी ते चैत्यभूमी मुंबई अशी ही यात्रा आहे.

बिहार मधील महाबोधी महाविहार मुक्ती च्या समर्थनार्थ जनसंवाद पंचशिल धम्म ध्वज यात्रा सुरु करण्यात आली आहे. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या नागभूमी नागपूर येथे दिक्षा घेतली व तमाम नवकोटी जनतेला दिक्षा दिली. त्याच पावन दिक्षाभूमीतून १७ ऑगस्ट २०२५ पासून ही यात्रा सुरु झाली आहे. महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन तसेच बीटी ॲक्ट १९४९ रद्द करणे ही मागणी घेऊन ही धम्म ध्वज, जनसंवाद यात्रा भंते विनाचार्य यांच्या नेतृत्वाखाली सुरु आहे. ही यात्रा आज शनिवार दि. २३ ऑगस्ट २०२५ रोजी जालना शहरात येत असून सकाळी ११ वाजता मंठा चौफुली येथून भिख्खु संघ, उपासक, उपासिका यांची पदयात्रा निघणार आहे. ही पदयात्रा मंठा चौफुली ते अंबड चौफुली पर्यंत निघणार असून गायत्री लॉन्स, अंबड चौफुली येथे या पदयात्रेचा समारोप होईल. त्यानंतर दुपारी २ वाजता गायत्री लॉन्स येथे प्रसिद्ध प्रबोधनकार विकास राजा आणि सुभाष कोठारे यांचा बुध्द भिम गीतांचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात सर्व उपासक आणि उपासीकांनी सहभागी व्हावे असे आवाहन बुध्दविहार समन्वय समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



## युवराज वायाळ तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत विजयी



**टेंभूर्णी -** जिजाऊ कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय टेंभुर्णी येथील अकरावीतील विद्यार्थी युवराज जालिंदर वायाळ याने तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये वयोगट १७ मधून प्रथम क्रमांक पटकावला आहे.

याप्रसंगी शाळेच्या अध्यक्षा डॉ. सौ. सुरेखा संजय लहाने यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी जिजाऊ कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन वायाळ,जिजाऊ इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक संजय फलटणकर, अमोल तेलंग्रे ,विनोद उबरहंडे ,सचिन देशमाने ,किशोर घुनावत, नावेद खान, करिष्मा मंदाडे, रितेश बाविस्कर ,विनोद धावलीया आदींची उपस्थिती होती.

## जगदंबा फिल्म प्रोडक्शन प्रस्तुत भावी सरपंच ही मराठी शॉर्ट फिल्म चित्रीकरनाचे उदघाटन



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** जगदंबा फिल्म प्रोडक्शन प्रस्तुत भावी सरपंच ही मराठी शॉर्ट फिल्म चित्रीकरनाचे उदघाटन टेंभूर्णी येथे पार पडले. यावेळी कॅमेरा पूजन करण्यात आले. या फिल्म चे दिग्दर्शन जाफराबाद तालुक्याचे प्रसिद्ध यूट्यूब व रील स्टार प्रताप नवले हे करत आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदर्श शिक्षक जमीर शेख सर, व प्रमुख पाहुणे म्हणून पी. जी. तांबेकर सर , रावसाहेब अंभोरे, मुख्याध्यापक देशपांडे सर, अमरसिंग गरंडवाल तर यावेळी पत्रकार संजय राऊत,अलकेश सोमाणी, शेख साबेर, अशोक पाबळे,विष्णू मगर, राज भाले, बजरंग दल प्रांत अधिकारी अविनाश देशमाने, त्याचप्रमाणे कलाकार संतोष औटी गोविंदपाल महाराज इंगळे, जनार्दन पैठणे , माने सर व टेंभूर्णी तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

जगदंबा फिल्म प्रोडक्शन निर्मित या शॉर्ट फिल्म चे निर्माता प्रताप नवले, सहनिर्माता अलकेश सोमाणी,

दिग्दर्शन प्रताप नवले सहदिग्दर्शन रावसाहेब अंभोरे, वैभव पैठने, संतोष औटी तर मुख्य कलाकाराच्या भूमिकेत समाधान पैठने, प्रताप नवले, वैभव पैठने,सुनील गरंडवाल, शालीनी पैठने, रुखमन नवले, मोनिका गरंडवाल हे आहेत.

झाडे लावा झाडे जगवा




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.